ePaper
शिंदे-फडणवीस सरकार बरखास्त करा; काँग्रेसच्या शिष्टमंडळाची मागणी



| वर्ष - 6 | अंक - 198 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- अकोले येथे किसान सभेचे राज्य अधिवेशन सुरू
- बैलगाडा शर्यत अंतिम लढ्याची तयारी
- एसटी आणि रेल्वे – किती खर्च आणि कोणासाठी?

www.mahaenews.com | मंगळवार | दिनांक 1 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बंद करा... गुजरातची गुलामी!

## राष्ट्रवादीचे आंदोलन : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 4 हजार पत्रे

**| पिंपरी |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**महाराष्ट्राचे गद्दार..गुजरातचे वफादार..! गुजरात तुपाशी.. महाराष्ट्र उपाशी..!, गद्दारांना 50 खोके.. महाराष्ट्राला धोके.! द्या आमच्या रोजगाराची हमी..बंद करा गुजरातची गुलामी..! अशी जोरदार घोषणबाजी करत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्राचे उद्योग गुजरातला जात असल्याच्या निषेधार्थ आज (सोमवारी) पिंपरीत आंदोलन केले. याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाब विचारण्यासाठी खराळवाडी पोस्ट ऑफीसमधून चार हजार पत्र पाठविण्यात आली आहेत.**

महाराष्ट्राचे उद्योग गुजरातच्या घशात घातले जात असल्याचा आरोप करत शिंदे-फडवणीस सरकारविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांच्या नेतृत्वात पिंपरीत आंदोलन करण्यात आले. या अंदोलनात माजी नगरसेवक अरुण बोराडे, प्रकाश सोमवंशी,राजू बनसोडे, राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सचिव डॉ. अरुण शिंदे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष आयुष निंबारकर, मंगेश बजबळकर,अमोल रावलकर, दिनेश पटेल,राहुल पवार,श्याम जगताप,प्रवीण खरात,दीपक गुप्ता,सागर वाघमारे,साहिल शिंदे, रूबान शेख,रोहित मोरे, सुरज पटेल,पियुष



अंकुश,बापू कातळे, युवराज पवार, संगीता कोकणे,मीरा कदम, समितताई गोरे, दत्तात्रय जगताप, विशाल जाधव, अकबर मुल्ला,कुणाल जगताप,अनिल चव्हाण,इरफान शेख,विकास गाढवे,जितेश पुलवरे, तानाजी जवळकर,सोशल मीडिया सेलचे अध्यक्ष समीर थोपटे,मयूर खरात,संकेत जगताप,केतन हुके सहभागी झाले होते.

### महाराष्ट्रातील युवकांवर बेरोजगारीची वेळ...

युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, "शिंदे-फडणवीस सरकार महाराष्ट्रसाठी नाही तर गुजरात साठी काम करत आहे. (NCP PROTEST) या तीन महिन्यात सुमारे महाराष्ट्रातील युवक-युवतींना साडेतीन लाख रोजगार निर्मिती होणारे तीन मोठे प्रकल्प नेमके गुजरात मध्ये का पाठवले जात आहेत.? इतर राज्यात का गेले नाहीत?महाराष्ट्रात हजारो रोजगार उपलब्ध करून देणारा वेदांत फॉक्सकॉन,बल्क ड्रॅग पार्क व आता टाटा एअरबस हे तिन्ही प्रकल्प गुजरातच्या निवडणुका मोदी यांनी जिंकण्यासाठी मदत म्हणून महाराष्ट्रातील तरुणांच्या हक्काचा रोजगार तुम्ही गुजरातला स्थलांतरीत करीत आहात". "यामुळे महाराष्ट्रातील लाखो कुटुंबावर बेरोजगारीची वेळ तुम्ही आणली असून,महाराष्ट्रातील तरुणांना बेरोजगार करून निष्पाप तरुणांना भोंगे, दहीहंडी, हनुमान चालीसा,दिवे फटाके यामध्ये अडकवून सरकार सोयीचे राजकारण करत आहे. संपूर्ण देशाचे पोट भरणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील उद्योगधंदे हे शिंदे-फडणवीस ज्या गतीने गुजरातला पळवत आहे. त्यामुळे एक दिवस असा येईल की महाराष्ट्रातील तरुणांना युपी बिहारमध्ये नोकरी शोधायला जावं लागेल अशी परिस्थिती महाराष्ट्रातील युवकांवर आणली जात आहे. याचा आम्ही निषेध करतो, असेही ते म्हणाले".

# मृत जनावरांच्या विल्हेवाटीसाठी जागा मिळेना!

## पशू वैद्यकीय विभागाकडून चाचपणी : विद्युतदाहिनी उपलब्ध करण्याची मागणी

**| पिंपरी |**

**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात मृत जनावरांना पुरण्यासाठी दफनभूमी, स्मशानभूमीची पुरेशी जागा नाही. त्यामुळे मृत जनावरांसाठी विद्युतदाहिनी उपलब्ध करण्याची मागणी केली जात आहे. त्यानुसार पालिकेच्या पशू वैद्यकीय विभागाकडून जागेची चाचपणी सुरू करण्यात आली आहे. महापालिकेने भोसरी बालाजीनगरमध्ये सात एकर परिसरात दफनभूमी सुरू केली आहे. सध्या या ठिकाणी गाय, बैल, म्हैस, उंट, गाढव, घोडे अशा ४०० दफन केलेल्या जनावरांची संख्या आहे. शहरातील काही ग्रामीण भागात गाय म्हशी पाळणाऱ्यांची संख्या मोठी आहे. घोडे, गाढव, बैलही पाळले जातात. त्यामुळे काही वेळा मृत्यूनंतर त्यांचे मृतदेह उघड्यावर टाकले आहेत. याबाबत तक्रारी वाढल्यावर महापालिकेने ठेका दिलेली संस्था दफन करण्याचे काम करते, पण त्यात हलगर्जीपणा होत आहे. दुभती म्हैस मेल्यावरही ती महापालिकेने उचलून न्यावी, यासाठी प्रयत्न होतो. काहीजण उंट आणून त्याच्या सवारीवर पैसा कमावतात. मात्र, ते मृत झाल्यावर



पसार होतात. अशाप्रकारे शहरात मृत जनावरांच्या दफनविधीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

गाय- म्हैस मृत झाल्यावर लोकप्रतिनिधींचे महापालिकेला फोन येतात. त्यांचे दफन कुठे करायचे ? असा प्रश्न कर्मचाऱ्यांनी केल्यास ते तुम्हीच ठरवा. आमच्या भागात पुरायचे नाही,

असा दम दिला जातो. महापालिकेने सद्य:स्थितीत मृत जनावरे पुरण्यासाठी अधिकची जागा आरक्षित केलेली नाही. कुत्रा वा अन्य छोटे प्राणी कुठेही पुरता येतात. पण, मोठे प्राणी पुरताना मोठी पंचायत होते. मृत जनावरांची विल्हेवाट महापालिकेने लावावी, असे

कायदा आहे. पण ती विल्हेवाट कशी लावावी, हे सांगितले नसल्याने प्रश्न जटिल होत आहे.

> "शहरात प्राण्यासाठी नेहरूनगर येथे विद्युत दाहिनी आहे. याठिकाणी दररोज ८ ते १० लहान मृत प्राण्यांवर अंत्यसंस्कार केले जातात. मात्र, ही दाहिनी नादुरूस्त झाली तर पुण्यात जावे लागते. त्यामुळे नेहरूनगर येथे लहान प्राण्यांसाठी आणखी एक सेट उभारण्यात येणार आहे. तसेच पाळीव मोठ्या प्राण्यांच्या अंत्यसंस्कारासाठी विद्युत दाहिनी उभारण्यासाठी जागेची चाचपणी सुरू आहे.
>
> **– सचिन ढोले,**
> **उपायुक्त पशू वैद्यकीय विभाग**

# अकोले येथे किसान सभेचे राज्य अधिवेशन सुरू!

## ओला दुष्काळप्रश्नी तीव्र आंदोलनाचे नियोजन करणार

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

अहमदनगर जिल्ह्यातील अपुणे: अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथे आज, सोमवारपासून अखिल भारतीय किसान सभेच्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनाला सुरुवात झाली. ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर असे तीन दिवस हे अधिवेशन चालणार आहे. किसान सभेचे केंद्रीय अध्यक्ष, डॉ. अशोक ढवळे, केंद्रीय कोषाध्यक्ष पी. कृष्णप्रसाद, किसान सभेचे नेते आ.जे.पी. गावीत, किसन गुजर, डॉ. अजित नवले यांच्यासह ६५ राज्य कौन्सिल सदस्य व महाराष्ट्रभरातून २३ जिल्हा अधिवेशनांमध्ये



निवडण्यात आलेले ३०० प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. सलग तीन दिवस ओला दुष्काळ, शेती संकट व ज्वलंत शेतकरी प्रश्नांवर विचार विनिमय करून शेतकरी आंदोलनाच्या वाटचालीची पुढील दिशा निश्चित करणार आहेत. शेतकऱ्यांच्या मोठ्या रॅलीने सुरूवात

अधिवेशनापूर्वी सोमवारी सकाळी शेतकऱ्यांची भव्य रॅली संपन्न झाली. बाजारतळ अकोले येथून निघालेल्या या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने शेतकरी, ग्रामीण श्रमिक व ग्रामीण कामगार सहभागी झाले. शेतकरी रॅलीनंतर महालक्ष्मी मंगल कार्यालय येथे जाहीर सभा घेण्यात आली. सभेला डॉ. अशोक ढवळे, पी. कृष्णप्रसाद, जे. पी. गावीत, आ. विनोद निकोले, किसन गुजर, डॉ. अजित नवले, उमेश देशमुख व अर्जुन आडे यांनी संबोधित केले.

### ओल्या दुष्काळाची मागणी तीव्र करणार

राज्यात परतीच्या पावसाने थैमान घातले असून, शेतकऱ्यांची तयार झालेली पिके पाण्यात गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यभर ३६ लाख हेक्टर वरील पिके बरबाद झाली आहेत. शेतकऱ्यांना अशा आपत्तीच्या काळात सरकारने तातडीने भरपाई व मदत देणे अपेक्षित असताना राज्यातील शिंदे- फडणवीस सरकार मात्र केवळ घोषणा व दिखावा करत आहे. शेतकऱ्यांच्या व सामान्य जनतेच्या मनात सरकारच्या या दुर्लक्षाच्या विरोधात तीव्र संताप खदखदत आहे.

### मोदींच्या धोरणावर टीका

केंद्रातील मोदी सरकारही सातत्याने शेतकरीविरोधी व कॉर्पोरेटधार्जिणे धोरण राबवत आहे. देशभर यामुळे शेती संकट अधिक तीव्र होत असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. वर्षभराच्या ऐतिहासिक व विजयी शेतकरी आंदोलनामुळे मोदी सरकारला तीन कृषी कायदे रद्द करावे लागले; पण शेतकऱ्यांना कायदेशीर व रास्त आधारभाव, कर्जमाफी, सर्वंकष पीक विमा योजना, वाढीव पेन्शन, सिंचन, वीज, रेशन व अन्नसुरक्षा असे अनेक ज्वलंत प्रश्न प्रलंबित आहेत.

## महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला गेल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचे पुण्यात आंदोलन

।पुणे। महाईन्यूज ।

मागील तीन महिन्यामध्ये वेदांता फॉक्सकॉन, बल्क ड्रग पार्क, मेडिकल इक्विपमेंट पार्क, टाटा एअरबससह तब्बल २२ प्रकल्प हे महाराष्ट्रामधून गुजरातसह इतर राज्यात गेल्याच्या निषेधार्थ आज पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मामलेदार कचेरीसमोर आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी केंद्र आणि राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील यावेळी करण्यात



आली. "राज्यात ईडी सरकार येऊन तीन महिन्याचा कालावधी झाला. त्या दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दिल्लीवारी अनेक वेळा झाली. त्यामधून राज्याला काही तरी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र या दिल्लीवारी मधून काहीच मिळाले नाही. पण वेदांता फॉक्सकॉन, बल्क ड्रग पार्क, मेडिकल इक्विपमेंट पार्क, टाटा एअरबस यासारखे प्रकल्प महाराष्ट्रामधून गुजरात सह इतर राज्यात गेले आहेत. या दौऱ्या दरम्यान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना थोडीशी तरी कल्पना असणार, किमान त्यावेळी तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना

## दोन जिवांचा नाहक बळी...

### पिंपरी पालिकेचा बेजबाबदार कारभार

।पिंपरी ।महाईन्यूज ।

दापोडीत भिंत पडून ठार झालेली वयोवृद्ध महिला आणि कासारवाडीत रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे मृत्युमुखी पडलेला दोन वर्षांचा मुलगा, या दोन स्वतंत्र ठिकाणी झालेल्या घटनांची महापालिकेने गंभीरपणे दखल घेतली नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. दापोडीत स्नेहलता गायकवाड (वय ६२) यांचा घराजवळीत भिंत अंगावर कोसळून काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला. यशवंतराव चव्हाण रुग्णालयात



मृतदेहांची अदलाबदलीचे प्रकरण झाले. त्यात भिंत कोसळून महिलेचा जीव गेल्याची गंभीर घटना दुर्लक्षित राहिली. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी, या एकूण प्रकरणासाठी अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केली. सात दिवसांत अहवाल सादर करण्याची सूचना समितीला करण्यात आली. प्रत्यक्षात, ती मुदत केव्हाच संपून गेली. या प्रकरणाबाबत पालिकेने मौन साधले आहे. कासारवाडीत रहदारीचा रस्ता सिमेंटीकरणासाठी महिनाभरापासून खोदून ठेवल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे व्यंकटेश शंकर डोकडे (वय २) या मुलाचा बळी गेला. अतिशय संथ गतीने कासारवाडी-पिंपळे गुरव मार्गावरील रस्त्यांचे सिमेंटीकरण सुरू आहे. त्यासाठी महिनाभरापासून रस्ता खोदून ठेवला आहे.

## हंगाम लांबल्याने कांदा महागण्याची शक्यता ; पावसाचा तडाखा

।पुणे। महाईन्यूज ।

परतीच्या पावसाचा कांदा रोपांना तडाखा बसल्याने नवीन लाल कांद्याच्या हंगाम यंदा पहिल्यांदाच लांबणीवर पडला आहे. दरवर्षी नोव्हेंबरमध्ये सुरू होणारा हा हंगाम दोन ते अडीच महिने लांबणार आहे. त्यामुळे नवा कांदा मोठ्या प्रमाणावर बाजारात येणार नसल्याने येत्या काही दिवसांत जुन्या आणि साठवणूक केलेल्या कांद्याला मागणी वाढण्याची चिन्हे आहेत. साठवणुकीचा कांदाही



कमीच असल्याने दरवाढीची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र, या दरवाढीचा फायदा उत्पादक शेतकऱ्यांना किती प्रमाणात मिळणार, याबाबत प्रश्नचिन्हच आहे. नवीन लाल कांद्याची (हळवी) लागवड नाशिक, नगर जिल्ह्यातील श्रीगोंदा, पारनेर तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर भागात मोठ्या प्रमाणावर केली जाते. ऑक्टोबर महिन्यात झालेल्या परतीच्या पावसाने नवीन कांद्याची रोपे वाहून गेल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. साधारणपणे नवीन लाल कांद्याची लागवड ऑगस्ट महिन्यात केली जाते.

नोव्हेंबर महिन्यात लाल कांद्याचा हंगाम सुरू होतो. यंदा ऑक्टोबर महिन्यात झालेल्या परतीच्या पावसामुळे नवीन कांद्याचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना पुन्हा कांदा लागवड करावी लागणार आहे. त्यामुळे नवीन कांद्याचा हंगाम यंदा पहिल्यांदाच दोन ते अडीच महिने लांबणीवर पडला असून यंदा बाजारात नवीन कांद्याची आवक साधारणपणे पुढील वर्षी १५ जानेवारीनंतर सुरू होईल, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील कांदा व्यापारी रितेश पोमण यांनी दिली. सध्या बाजारात जुना कांदा उपलब्ध आहे. जुन्या कांद्याचा साठा संपत चालला आहे. चाळीत साठविलेल्या जुन्या कांद्याच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. पावसामुळे जुन्या कांद्याच्या प्रतावरीवर परिणाम झाला आहे. नवीन कांद्याचा हंगाम दोन ते अडीच महिने लांबणीवर पडला आहे. अशा परिस्थितीत जुन्या कांद्याला मागणी वाढणार आहे. कर्नाटकातील नवीन कांद्याचे पावसामुळे नुकसान झाले आहे. दक्षिणेकडील राज्यातून महाराष्टातील जुन्या कांद्याला मागणी वाढणार आहे. महाराष्ट्रातील जुन्या कांद्याचा साठा संपत चालला असून पुढील दोन ते अडीच महिने कांदा दरात तेजी निर्माण होण्याची शक्यता आहे.

# बैलगाडा शर्यत अंतिम लढ्याची तयारी!

## आ. महेश लांडगे, संघटना प्रतिनिधी लागले कामाला, 23 नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायलयात अंतिम सुनावणी

पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

**महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यती कायमस्वरुपी सुरू राहाव्यात. या करिता अद्यापही न्यायालयीन लढा द्यावा लागणार आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. त्यामुळे राज्य सरकार आणि बैलगाडा संघटना प्रतिनिधी यांची पुण्यातील विधान भवन येथे महत्वपूर्ण बैठक घेण्यात येणार आहे.**



राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक दि. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२:३० वाजता होणार आहे.

पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या पुढाकाराने होणाऱ्या बैठकीला भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, बैलगाडा संघटना प्रतिनिधी, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायलयातील याचिकेच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे संदीप बोदगे म्हणाले की, देशभरातील बैलगाडा शर्यती सुरू करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने अंतिरीम आदेश दिले होते. मात्र, महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतींवर बंदी होती. त्यामुळे अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील शर्यती सुरू करण्याबाबत न्यायालयाला विनंती केली होती. त्यामध्ये बैलगाडा शर्यतींना परवानगी देण्यात आली होती. तसेच, पाच न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर अंतिम सुनावणी होईल, असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. आता देशातील बैलगाडा शर्यतींबाबत दि.२३ नोव्हेंबर २०२२ रोजी अंतिम सुनावणी होणार आहे. त्यादृष्टीने पूर्वतयारीसाठी राज्य शासनाकडे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मागणी केली होती. त्याअनुशंगाने मंत्री महोदयांनी बैठकीचे नियोजन केले आहे.

> **देशातील बैलगाडा शर्यतींवर मे २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली होती. त्यापूर्वी तत्कालीन महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये बैलगाडा शर्यतींवर बंदी घातली होती. त्यावेळीपासून न्यायालयीन लढा सुरू झाला. डिसेंबर २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायलयाने काही अटींवर बैलगाडा शर्यतींना परवानगी दिली. शर्यती सुरू झाल्या असल्या तरी संबंधित याचिकेवर अंतिम सुनावणी होणार आहे. निश्चितपणाने शेतकरी आणि बैलगाडा प्रेमींच्या बाजुनेच न्यायदेवतेचा कौल राहील.**
>
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष व आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# ‘टीओडी’मुळे सोसायटी पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

## बांधकाम व्यावसायिकांची मागणी : नियमावलीत स्पष्टता नाही, निर्णय घ्या !

पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

मेट्रो स्थानक परिसरातील ट्रान्झिट ओरिएन्टेड झोन (टीओडी) नियमावलीला राज्य शासनाने मान्यता देताना टीओडी झोनची हद्द तीस टक्क्यांनी म्हणजे दीडशे मीटरने वाढविण्याचा अधिकार महापालिकेला प्राप्त झाला आहे. त्यामुळे मेट्रो स्थानक परिसरातील साडेसहाशे मीटर अंतरातील जुन्या सोसायट्यांचा पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. दरम्यान, सहा मीटर रुंदीच्या रस्त्यालगतच्या इमारतींच्या बांधकामाबाबत नियमावलीत स्पष्टता नसल्याने त्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी बांधकाम व्यावसायिकांकडून करण्यात आली आहे.



मेट्रो प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात ३२ किलोमीटर लांबीच्या दोन मार्गिकांची तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) शिवाजीनगर-हिंजवडी या मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. या तिन्ही मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूला पाचशे मीटर अंतराचा परिसर टीओडी झोन निश्चित करण्याची शिफरास राज्य शासनाकडे करण्यात आली होती. त्यामुळे मेट्रो प्रकल्पाला आर्थिक फायदा होईल, असा दावाही करण्यात आला होता.

मात्र त्यानंतर मार्गिकांऐवजी केवळ स्थानकाच्या दोन्ही बाजूला पाचशे मीटर अंतरापर्यंत टीओडी झोन निश्चित करावा, असा बदल करण्यात आला होता. तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. त्यावर राज्य शासनाकडून हरकती सूचना मागविण्यात आल्या होत्या. मात्र टीओडी नियमावलीला मान्यता देण्याची प्रक्रिया रखडली होती. राज्य शानसाच्या नगरविकास विभागाने त्याबाबत अध्यादेश काढला आहे. मेट्रो स्थानकासाठीचे टीओडी क्षेत्रही निश्चित करताना राज्य शासनाने अनेक सवलतीही दिल्या आहेत.

> ### प्रिमियम शुल्कात सवलत...
>
> **टीओडी क्षेत्र निश्चित करताना त्याची हद्द ३० टक्क्यांनी म्हणजे दीडशे मीटरने वाढविण्याचे अधिकार महापालिकेला दिले आहेत. त्यामुळे आता स्टेशनच्या पाचशे मीटरऐवजी साडेसहाशे मीटरपर्यंत हा झोन लागू झाल्यास अनेक जुन्या सोसायट्यांना पुनर्विकास करताना, या नियमावलीचा फायदा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रिमिअम शुल्कात सवलत, तसेच वाढीव एफएसआय अशा अनेक सवलती नियमावलीत देण्यात आल्या आहेत.**

# वैधता संपलेल्या औषधांचे सर्रास वाटप

## वायसीएममध्ये रुग्णांच्या जिवाशी खेळ

पिंपरी।
।महाईन्यूज।प्रतिनिधी।

वैधता संपलेली औषधे रुग्णांना वाटप करण्यात येत असल्याचा धक्कादायक प्रकार पिंपरी पालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयात (वायसीएम) उघड झाला आहे. रुग्णांच्या जिवाशी खेळ करणारे असे धोकादायक प्रकार वारंवार घडत असावेत. तथापि, काहीच कारवाई होत नसल्याने कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे फावले असल्याची शंका विश्वसनीय सूत्रांकडून व्यक्त करण्यात येते काही दिवसांपूर्वी एका गरोदर महिलेला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर रुग्णालय सोडताना तिला औषधांची चिठ्ठी लिहून देण्यात आली. तिचा पती औषध विभागात गेला असता, त्यांना औषधांची तीन पाकिटे देण्यात आली. ती औषधे मुदत संपलेली होती, असे त्यांच्या निदर्शनास आले. असा प्रकार इतरांबाबत होऊ नये म्हणून त्यांनी चव्हाण रुग्णालय पदव्युत्तर संस्थेचे अधिष्ठाता राजेंद्र वाबळे यांना तक्रार अर्ज दिला.या तक्रारीनंतर चार जणांचे पथक औषध विभागात तपासणीसाठी पाठवण्यात आले. त्यांनी तपासणी केल्यानंतर गोळ्यांचा मोठा साठा मिळून आला, ज्याची मुदत ऑगस्ट महिन्यातच संपली होती. त्याचप्रमाणे, मुदत संपलेल्या इतर जवळपास दोन हजार गोळ्यांचेही वाटप झाले होते, अशीही माहिती समोर आली. याबाबतचा अहवाल तपासणी पथकाने अधिष्ठातांना दिला. त्यानंतर पुढे काय झाले, याविषयी स्पष्टता नाही. असे प्रकार यापूर्वी झाले. मात्र, तेव्हा ठोस कारवाई झाली नाही, असे सांगण्यात येते.



## संपादकीय

# चिमणीचं घर सोन्याचं !

***"डेटा इज न्यू गोल्ड' किंवा 'डेटा इज न्यू ऑइल' हे सुविचार गेली दीडेक दशके आपण सारेच ऐकत आलो आहोत. डेटा म्हणजे विदा. डिजिटल विश्वातील माहितीचे भांडार.***

या माहितीला भविष्यात त्रैलोक्याचे मोल येईल, अशी भाकिते थोर तत्त्वचिंतकांनी वारंवार केली होती. त्याची झलक यंदा बघायला मिळाली. 'ट्विटर' हे डिजिटल व्यासपीठ कुलुप-किल्लीसकट 'टेस्ला' मोटारीचे कल्पक निर्माते आणि धनाढ्य उद्योजक एलॉन मस्क यांनी तब्बल ४४ अब्ज डॉलरना विकत घेतले. ४४ अब्ज डॉलर म्हणजे सुमारे ३६२७ अब्ज ८६ कोटी ६३ लाख आठ हजार रुपये! काल-शुक्रवारी हा अकटोविकट व्यवहार पूर्ण झाला. 'ट्विटर'च्या मुख्यालयाचा अधिकृत ताबा घेत एलॉन मस्कने ट्विट केले- 'द बर्ड इज फ्रीड.'पक्षी मुक्त झाला आहे! या बदलामुळे 'ट्विटर'चे व्यवस्थापन पूर्णत: बदलले. या अत्यंत लोकप्रिय व्यासपीठाची वैशिष्ट्ये, रुपरेषा आणि स्वभावही आता बदलेल, हेही उघड आहे.

एलॉन मस्क हे कल्पक आणि धाडसी उद्योजक म्हणून लौकिकप्राप्त आहेत. 'स्पेसएक्स' ही खासगी अंतराळ संशोधन कंपनी स्थापन करुन मस्क यांनी अवकाशातही भरारी मारली आहे. नुसत्या गुंतवणुका करुन ते निव्वळ पैसा ओढत नाहीत, 'स्पेसएक्स'च्या अंतराळ मोहिमेद्वारे ते स्वत: अवकाशात जाऊन आले आहेत. भविष्यात परग्रहावर मानवी वस्ती उभारण्यात आणि आंतरग्रहीय वाहतुकीचे पर्याय उभे करण्याची त्यांची स्वप्नील योजना एव्हाना कार्यरत झाली आहे. 'ट्विटर' खरेदी करुन डिजिटल विश्वातला सर्वात मोठा 'डेटाबेस' हाताशी मिळवणारे मस्क आपले अवकाशातील स्वप्नही पूर्ण करतील, असा त्यांच्या चाहत्यांना विश्वास वाटतो. तूर्त तरी त्यांनी सारी शक्ती पणाला लावून 'ट्विटर'ची चिमणी तेवढी पळवून नेली आहे -तीही अगडबंब रक्कम मोजून! अर्थात, आपण हे सारे नफ्यासाठी करत नसून मानवकल्याणासाठी करतो आहोत, असे मस्क यांनी स्पष्ट केले आहे. एवढी मोठी रक्कम मानवतेसाठी खर्च करणारे ते पृथ्वीवरले एकमेवाद्वितीय असे उद्योजक म्हणावे लागतील.

'ट्विटर' ची विक्री होणार हे गेल्या एप्रिल महिन्यातच स्पष्ट झाले होते. मस्क यांनी ४४ अब्ज डॉलरची पहिली आणि अखेरची ऑफर 'ट्विटर'च्या व्यवस्थापक मंडळासमोर ठेवली, तेव्हापासून अनेक नाट्यमय उलथापालथी होऊन हा व्यवहार अखेर शुक्रवारी सकाळी सुफळ संपूर्ण झाला. मध्यंतरी 'ट्विटर' वर बनावट खाती लक्षणीय संख्येने असल्याची शंका मस्क यांनी उघडपणे बोलून दाखवली होती, आणि कंपनीचे व्यवस्थापक मंडळ विश्वासार्ह माहिती देत नसल्याचा आरोप करत व्यवहारातून अंग काढून घेण्याचा पवित्राही घेतला होता. त्यावर 'ट्विटर'ने त्यांना न्यायालयात खेचले. अखेर न्यायालयीन संघर्ष टाळण्याच्या पूर्वअटीवर मस्क यांनी करारानुसार विलिनीकरण आणि ताब्याची प्रक्रिया पार पाडली.



## आनंदी सकाळ


### सण हवेतच

सण-समारंभ म्हणजे आनंद, उत्साहाची पर्वणीच. सगळीकडे मंगलमय वातावरण. घरापासून बाजारपेठेपर्यंत सगळीकडे बहरच. करोनाच्या संकटामुळे सर्व क्षेत्रांत साचलेले मळभ दूर सारून, यंदा दिवाळी धूमधडाक्यात साजरी होत आहे. करोनामुळे उध्वस्त झालेली मने, जीवाभावाची हरवलेली माणसे, व्यवसायावरील गंडांतर आणि मंदीचे सावट, हे सारे सारे मागे सारत उगवलेली ही दिवाळीची मंगलमय पहाट आहे. माणसे, कुटुंब आणि समाज एकमेकांपासून तोडणारे संकट दूर झाल्यानंतर, आता नात्याची नवी वीण पुन्हा घट्ट करणारे सण नव्या उत्साहाने साजरे होत आहेत, ही आनंदाची बाब आहे.प्रारब्ध म्हणजे न समजणाऱ्या गोष्टींचे कारण होय, असे म्हणायला हरकत नाही. संतांनादेखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुख-दुःख त्यांना नाही. व्यवहारदृष्ठ्या औषध घेऊन मग भोग भोगणे हाच मार्ग खरा आहे.

# एसटी आणि रेल्वे – किती खर्च आणि कोणासाठी?




'एसटीच्या कर्मचाऱ्यांचे सप्टेंबरचे थकीत वेतन आता त्यांना मिळणार. दुसरी बातमी – रेल्वेच्या कर्मचाऱ्यांना या महिन्यात ७८ दिवसांचा बोनस, म्हणजेच सरासरी रु. १६,०००, मिळणार. यामागची सबब – २०२१ एप्रिल ते सप्टेंबरमध्ये रेल्वेची एकूण कमाई रु. १७,००० कोटी होती. ती २०२२ मध्ये रु. ३३,००० कोटी झाली, म्हणजेच त्यात ९५ टक्के वृद्धी झाली! त्यानिमित्ताने हा बोनस. यावरून रेल्वेचा कारभार एसटीच्या तुलनेत जास्त चांगला असणार, अशी समजूत होणे साहजिक आहे. पण तो निष्कर्ष काढायच्या आधी त्यातील काही मुद्दे आपण तपासून पाहू. यासाठी एसटी व रेल्वेच्या आर्थिक अहवालांमधील उपलब्ध आकडेवारी सोबतच्या तक्त्यात दिली आहे,



ती पाहू.

पहिली गोष्ट आपल्या लक्षात येईल की २०२०-२०२२ या काळात पूर्ण देश कोविडच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेच्या छायेत होता. २०२०-२१ मध्ये पहिल्या लाटेच्या 'लॉकडाऊन'च्या वर्षांत रेल्वेचे प्रवासी उत्पन्न केवळ १५,००० कोटी होते व २०२१-२२ मध्ये त्यात झालेली वाढ २९० टक्के इतकी मोजली गेली. एवढ्यावरून, रेल्वेचा कारभार '२९० टक्क्यांनी सुधारला' हे म्हणणे अर्थातच योग्य नाही. खरी तुलना कोविडआधीच्या परिस्थितीशी झाली पाहिजे हे स्पष्ट आहे. म्हणूनच यंदाच्या ९५ टक्के वृद्धीचा नेमका अर्थ काय, आणि हा बोनस म्हणजे स्वत:ची पाठ थोपटून स्वत:ला बक्षीस देण्यात येत आहे का, हे प्रश्न साहजिक आहेत.

दुसरे आपल्या लक्षात येईल की, माल वाहतूक हा रेल्वेच्या एकूण उत्पन्नाचा मोठा भाग आहे. रूळ जरी एकच असले तरी, मालगाड्या, इंजिने हा स्टॉक वेगवेगळा आहे. रेल्वे प्रवासी भाडे प्रति किलोमीटर फक्त ४८ पैसे असले तरी खर्च ११६ पैसे, म्हणजेच भाड्याच्या अडीचपट आहे, असे रेल्वेमंत्र्यांनी राज्यसभेत सांगितले. प्रवासी वाहतुकीचा तोटा माल वाहतुकीच्या नफ्यातून भरून येत असतो. त्यात वीजनिर्मितीला लागणाऱ्या कोळशाच्या वाहतुकीचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. यामुळे मुंबई-वाराणसी रेल्वे तिकिटाचा खर्च फक्त ३७५ रु. आहे. मात्र पुणे-पंढरपूर एसटीचे भाडे ४८४ रु. आहे. थोडक्यात अंतरराज्य लांब पल्ल्याचा रेल्वे प्रवास कृत्रिमरीत्या स्वस्त ठेवण्यात येत आहे.

तिसरी गोष्ट – एसटी आणि रेल्वे, दोन्हींसाठी कर्मचारी वेतन हे सर्वसाधारण वर्षांच्या उत्पन्नाच्या ४५ टक्के आहे. मात्र भांडवल वा इतर खर्चासाठी केंद्र शासन रेल्वेला एकूण उत्पन्नाच्या १०५ टक्के अनुदान देते. एसटीसाठी हा आकडा फक्त १८ टक्केच आहे. रेल्वेबाबत रुळांची देखभाल, दुपदरीकरण, नवीन मार्ग, नवीन इंजिने व डबे, वंदे भारत या नवीन गाड्या, त्याला लागणारे तंत्रज्ञान व इतर गोष्टींवर खर्च होत असणार. गेली अनेक दशके, यातील बराच खर्च दिल्ली आणि उत्तर भारतावर केंद्रित होत आहे. गेल्या २० वर्षांत रेल्वेच्या जाळ्याची एकूण लांबी ६२,००० कि. मी.वरून ६९,००० कि. मी., म्हणजेच, फक्त ११ टक्क्यांनीच वाढली आहे.

# समाजाचं घातक मौन

### गुजरातमधील खेडा जिल्ह्यात अलीकडे माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली.

स्थानिक पोलिसांनी ५-६ तरुण मुस्लिम मुलांना विजेच्या खांबाला बांधून तालिबानी पद्धतीने त्यांना बेदम मारहाण केली. या तरुणांवर नवरात्रीच्या गरबाच्या वेळी दगडफेक करण्याचा आरोप आहे. त्यांना पोलिसांनी पकडलं आहे. करोनाच्या दोन वर्षानंतर यावेळी गुजरात राज्यात सर्वत्र नवरात्रोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला गेला. अहमदाबाद, राजकोट, वडोदरा, सुरत यासारख्या शहरांपासून ते लहान-लहान गावांत पण नवरात्रीचा सर्वांनी आनंद घेतला. गुजरातचा नवरात्रोत्सव पाहण्यासारखा असतो. देशविदेशातील अनेक जण मुद्दामहून गरबा पाहण्यासाठी येतात. तरुण मुलं-मुली पारंपरिक नवीन कपडे घालून गाण्यांवर गरबा खेळतात. गुजरातच्या नवरात्रीची एक वेगळी ओळख आहे.

खेडा जिल्ह्यातील उंधेला गावात मात्र नवरात्रीला हिंसक वळण मिळालं. अहमदाबादपासून जेमतेम ४६ कि.मी. अंतरावर असलेल्या उंधेला येथे नवरात्रीच्या आठव्या रात्री हुसेनी चौकात आयोजित करण्यात आलेल्या



नवरात्रोत्सवात दगडफेक झाली आणि परिस्थिती बिघडली. हुसेनी चौकात तुळजाभवानी मंदिर आणि मशिद जवळजवळ आहे. हुसेनी चौकात नवरात्री करू नये, असे मुस्लिमांचं म्हणणं होतं. पुढच्या काही दिवसात ईद येत होती. गावाचे सरपंच इंद्रवदन पटेल यांचा या चौकात नवरात्रोत्सव आयोजित करण्याचा आग्रह होता. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात पटेल सरपंच म्हणून निवडून आले होते. त्यांचं म्हणणं आहे की त्यांनी या जागी नवरात्री आयोजित करण्याची शपथ घेतली होती. ३ ऑक्टोबरच्या रात्री ११च्या सुमारास मुस्लिमांनी गरबा बंद करण्यास सांगितलं आणि त्यावरून दोन्ही समाजात भांडणाची सुरुवात झाली. "मुस्लिम तरुणांनी अचानक दगडफेक सुरू केली," असं इंद्रवदन पटेल यांच म्हणणं आहे. यापूर्वी उंधेला येथे २००२चा अपवाद केल्यास दोन्ही समाजांत फारसा तणाव कधीच नव्हता. त्यापूर्वी दोन्ही गटांत काही चर्चाही झाली होती; परंतु त्यातून काही निष्पन्न झालं नव्हतं. दगडफेकीनंतर पोलिसांनी काही मुस्लिम तरुणांना अटक केली. त्यापैकी ५-६ तरुणांना दुसऱ्या दिवशी एकामागून एकाला विजेच्या खांबाशी बांधून पोलिसांनी प्रचंड मारहाण केली. एका पोलिसानं त्यांच्या खिशातले मोबाइल काढले आणि दुसऱ्यांनी त्यांना लाठ्यानी मारहाण केली. पोलिसांचं हे कृत्य बेकायदा होतं. पोलिसांना कायदा हातात घेण्याचा अधिकार नाही. आरोपींना न्यायालयासमोर उपस्थित करण्याची जबाबदारी पोलिसांची आहे, शिक्षा द्यायची जबाबदारी त्यांची नाही. शिक्षा द्यायची की नाही हे ठरवणं न्यायालयाचं काम आहे. पोलिस जेव्हा जाहीरपणे मारहाण करत होती तेव्हा सुमारे ४०० जणांचा जमाव टाळ्या वाजवून आणि घोषणा देऊन पोलिसांच समर्थन करत होता.

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# संसदेचे हिवाळी अधिवेशन येत्या 21 नोव्हेंबरपासून सुरु होण्याची शक्यता

## 'सर पटक देंगे तो भी नवंबर में नयी संसद पूरी करहा तैय्यार नही हो सकती !"

**।नवी दिल्ली । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**




संसदेचे यंदाचे हिवाळी अधिवेशन नवीन त्रिकोणाकृती संसद भवनातच होणार, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा निर्धार प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता अंधुक आहे. कारण नवीन संसद भवनाची इमारत उभी राहिली असली तरी भव्य इमारतीतील अनेक कामे अद्याप अपूर्ण आहेत व नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत ती पूर्ण होणे केवळ अशक्य आहे. या एतिहासिक इमारतीच्या कामात कोणतीही घाई गडबड परवडणार नाही, असे या कामात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सूत्रांचे म्हणणे आहे. या स्थितीत हिवाळी अधिवेशनातील एखाद दिवस म्हणजे संविधान दिनाच्या बैठका नवीन इमारतीत घेऊन उर्वरीत अधिवेशन सध्याच्याच संसदेत चालविण्याचा पर्याय सरकारच्या मनात असल्याची निश्चित माहिती मिळाली आहे.

संसदेचे हिवाळी अधिवेशन येत्या २१ नोव्हेंबरपासून (सोमवार) सुरू होण्याची शक्यता आहे. प्रथेनुसार २५ डिसेंबरच्या आत हे अधिवेशन संपवायचे असते. २०२० पासून नवीन संसदेचे बांधकामही २४ तास रात्रंदिवस सुरू आहे. सध्या इमारतीचे बांधकाम झाले आहे. मात्र सूत्रांच्या म्हणण्यानुसार फक्त इमारतीच्या भिंती बांधून झाल्या की सारे काम झाले, हे साध्या घराबाबतही होऊ शकत नाही तर येथे एक भव्य सदन आकाराला येत आहे तेथे असे कसे होऊ शकेल. ब्रिटीशांनाही सध्याचे संसद भवन बांधण्यासाठीही जवळपास सात वर्षे लागली होती. त्यांनी दूरदृष्टीने केलेल्या नियोजनात संसदेच्या चारही बाजूंना अशी विशाल मोकळी जागा सोडली होती की त्यापैकी कोणत्याही भागात सध्याइतकेच भव्य सदन बांधले जाऊ शकेल. त्यानुसार राज्यसभेच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला ६५ हजार स्क्वेअर फूट जागेवर नवीन संसद भवन आकाराला येत आहे. संसदेच्या नवीन इमारतीचे काही बांधकाम नियोजित वेळेच्या पुढे जाणार हे आता निश्चित मानले जाते. लोकसभा व राज्यसभा सचिवालयांना, अधिवेशन नवीन इमारतीत होईल याबाबतची कोणतीही सूचना सरकारकडून अद्याप आलेली नसल्याची माहिती आहे. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यापासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनापूर्वी संसदेची नवीन इमारत पूर्ण करण्याचे मोदी सरकारने लक्ष्य ठेवले होते. मात्र तो मुहूर्त गाठणे अशक्य असल्याचे प्रत्यक्ष बांधकामात सहभागी असलेल्यांचे म्हणणे आहे. सूत्रांनी सांगितले की ही इमारत म्हणजे आयुष्यात एकदाच येणारा, भव्य आणि गुंतागुंतीचा प्रकल्प आहे जो अत्यंत आव्हानात्मक वेळेवर बांधला जात आहे, चोवीस तास सुरू असलेल्या संसद भवनाच्या इमारतीचे 'सिव्हील' काम जवळपास पूर्ण झाले आहे.

मात्र मध्यवर्ती वानुकूलन यंत्रणा, विद्युत जोडणी, भिंतीवरील भव्य शिल्पे-भित्तीचित्रे, गालिचे आणि इतर गुंतागुंतीची अनेक कामे अजूनही अपूर्ण आहेत. ती डिसेंबर २०२२ अखेरपर्यंत पूर्ण होऊ शकत नाहीत. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, "सर पटक देंगे तो भी नवंबर में नयी संसद पूरी करहा तैय्यार नही हो सकती !" लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी अलीकडेच दिवाळीनिमित्त संसद भवन बांधकामात सहभागी असलेल्या अधिकारी व श्रमीकांची सदिच्छा भेट नुकतीच घेतली तेव्हा त्यांनाही वस्तुस्थिती स्पष्टपणे सांगण्यात आली व घाईघाई करणे योग्य नव्हे असेही सुचविण्यात आले अशी माहिती आहे.नवीन इमारत अर्थसंकल्पीय अधिवेशनापर्यंत पूर्ण सज्ज होईल असा विश्वास अधिकाऱ्यांना आहे. नवीन संसदेची इमारत पूर्णपणे सुसज्ज झाल्यानंतरही प्रत्यक्ष अधिवेशन सुरळीत चालावे आणि खासदारांना सर्व मदत मिळावी यासाठी सचिवालयांच्या कर्मचाऱ्यांना प्राथमिकदृष्ट्या प्रशिक्षित करण्यासाठी किमान १५-२० दिवस लागतील.

### या स्थितीत सरकारसमोर दोन पर्याय आहेत

**१) हिवाळी अधिवेशनातील राज्यघटना दिनासारखी (२६ नोव्हेंबर) एखादी महत्वाची बैठक नवीन संसदेत भरविणे.**

**२) नवीन संसदेतच हिवाळी अधिवेशन घेण्याचा हट्ट पूर्ण सोडून देऊन अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक व राष्ट्रपतींचे अभिभाषण नवीन इमारतीत करायचे.**

---

# विठुरायाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकऱ्यांवर काळाचा घाला

## भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू

**।मुंबई ।महाईन्यूज ।**

कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांवर काळाने घाला घातला आहे. मिरज-पंढरपूर महामार्गावर जुनोनी येथे पायी दिंडीत कार घुसल्याने भीषण अपघात झाला आहे. या अपघातात सात वारकऱ्यांचा मृत्यू झाला आहे. तर, ६ जण गंभीर जखमी असल्याची माहिती मिळत आहे.



मिरज-पंढरपूर महामार्गावरील सांगोल्यातील जुनोनी येथे हा अपघात झाला. अपघातातील सर्व वारकरी कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील जठारवाडी गावातील आहेत. कार्तिकी एकादशीनिमित्त ३२ वारकरी पायी पंढरपूरला जात होते, तेव्हा हा अपघात घडला.

जुनोनी येथे पायी चालत असताना टाटा नेक्सॉन कारने त्यांना धडक दिली. या अपघातात ७ वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, सहा जण गंभीर जखमी आहेत. मृत झालेल्यांमध्ये पाच महिला, एक पुरुष आणि एक लहान मुलं आहे.

जखमींना सांगोल्यातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

# "राज्यातील 'ईडी' सरकार बरखास्त करा"

## काँग्रेसचे राज्यपालांना निवेदन

**।वाई ।महाईन्यूज ।**



राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार मागील तीन महिन्यांत शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार, तरुण, विद्यार्थी महिला, सर्वसामान्य नागरिकांसह कोणत्याही घटकाला दिलासा देऊ शकले नाही. या सरकारच्या गलथानपणामुळे राज्य अधोगतीला गेले असून जनतेमध्ये प्रचंड संताप आणि निराशा आहे. राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी आंधळे, मुके, बहिरे 'ईडी' सरकार बरखास्त करावे, अशी मागणी कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची राजभवन येथे भेट घेऊन यांना याबाबतचे निवेदन दिले आहे. राज्यासमोरील संकट आणि जनतेला भेडसावणाऱ्या ज्वलंत प्रश्नांकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत आहे. परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. बहुतांश जिल्ह्यामध्ये खरीप पीक पूर्णपणे वाया गेले आहे. कापूस, सोयाबीन, बाजरी, तूर, मका, उडीद ही सर्वच पीके शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने आणि मेहनतीने वाढवली, त्याला खते आणि कीटकनाशके यासाठी मोठा खर्चही केला होता. मात्र पीके हातात येण्याच्या आधीच वाया गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या शेतकऱ्याला आर्थिक मदतीची गरज आहे. त्यामुळे राज्य सरकारने त्वरित ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्याला मदतीचे पॅकेज देण्याची आवश्यकता आहे. पण अद्याप सरकारने ओला दुष्काळही जाहीर केला नाही आणि शेतकऱ्यांना मदतही दिली नाही, अशी प्रतिक्रिया नाना पटोले यांनी दिली आहे.

एकीकडे निसर्गाचा मार आणि दुसरीकडे सरकारचे दुर्लक्ष अशा दुहेरी संकटात राज्यातील शेतकरी सापडला आहे. राज्यातील ED सरकार शेतकऱ्यांसाठी काहीच करत नाही त्यामुळे शेतकऱ्यांचा सरकारवर विश्वास राहिला नसून नैराश्यापोटी ते आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. राज्यात दर आठ तासाला एक शेतकरी आत्महत्या करत आहे. ऐन दिवाळीच्या सणात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी राज्यातील एका शेतकरी दाम्पत्याने आत्महत्या केली, ही राज्याला लाज आणणारी बाब आहे, असेही ते म्हणाले.

# मोरबी दुर्घटनेप्रकरणी पंतप्रधान मोदी ॲक्शन मोडमध्ये!

## गांधीनगरमध्ये बोलवली उच्चस्तरीय बैठक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गुजरातच्या मोरबी येथे १०० वर्षे जुना झुलता पूल कोसळल्याची घटना रविवारी संध्याकाळच्या सुमारास घडली होती. या घटनेत १३४ जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गांधीनगरमध्ये उच्चस्तरीय बैठक बोलावली होती. या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी मोरबी दुर्घटनेच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. दरम्यान, पंतप्रधान मोदी हे तीन दिवसीय गुजरात दौऱ्यावर असून उद्या (मंगळवारी) ते घटनास्थळी भेट देणार आहेत.

या प्रकरणी ९ जणांना अटक

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर ओरेव्हा कंपनीच्या मॅनेजरसह तिकीट खिडकीवरील कर्मचारी आणि पुलाचे व्यवस्थापन करणाऱ्या नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या



विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती राजकोट पोलिसांनी दिली आहे.

रविवारी संध्याकाळी घडलेल्या या भीषण घटनेत १३४ जणांचा मृत्यू झाला होता. तर अनेकजण जखमी होते. या दुर्घटनेत राजकोटचे भाजपा खासदार मोहनभाई कल्याणजी कुंदारिया यांच्याही परिवारातील १२ जणांचा मृत्यू झाला.

# भारत जोडो यात्रा 18 नोव्हेंबरला महाराष्ट्रात होणार दाखल

## काँग्रेस नेत्यांकडून राहुल गांधींच्या स्वागताची जय्यत तयारी

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



काँग्रेस नेते राहुल गांधी (rahul gandhi)यांची काश्मीर तर कन्याकुमारी ही भारत जोडो पदयात्रा (bharat jodo yatra) सुरु आहे. 2024 च्या निवडणुकांची तयारी आणि देशात काँग्रेसची पाळंमुळं घट्ट करण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान राहुल गांधी यांची ही पदयात्रा आता महाराष्ट्रात दाखल होणार आहे. 18 नोव्हेंबर रोजी राहुल गांधींची हि यात्रा बुलढाणा (buldhana) जिल्ह्यातील शेगाव येथे येणार आहे. याच दिवशी सायंकाळी राहुल गांधी यांची जंगी सभासुद्धा होणार आहे. राहुल गांधींच्या या सभेची आणि यात्रेची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले(nana patole) यांच्या सोबत माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, चंद्रकांत हंडोरे, यशोमती ठाकूर यांच्यासह काँग्रेसचे मोठे नेते शेगाव येथे तयारी करताना दिसून येत आहेत.

राहुल गांधी यांची पदयात्रा तीन दिवस बुलढाणा जिल्ह्यात असणार आहे. त्यामुळे सभेचे नियोजन करण्यासाठी आणि सभास्थळाची पाहणी कारण्यासाठी काँग्रेच्या या नेत्यांची शेगावमध्ये लगबग दिसत आहे. दरम्यान राहुल गांधी यांच्या सभेसाठी सहा लाख लोकं येणार असून त्यानुसार नियोजन करण्यात आले आहे. अशी माहिती नाना पटोले यांनी दिली. काँग्रेसकडून राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेची (bharat jodo yatra) जय्यत तयारी करण्यात

# सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय! बलात्कार पीडितांवर होणाऱ्या 'टू फिंगर टेस्ट'वर घातली

## 'टू फिंगर टेस्ट' करणाऱ्यांना दोषी ठरवणार, सुप्रीम कोर्टाने खडसावलं

। शांघाय । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

सुप्रीम कोर्टाने बलात्कार तसंच लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये करण्यात येणाऱ्या कौमार्य चाचणीवर (टू फिंगर टेस्ट) बंदी घातली आहे. तसंच अशा प्रकारची चाचणी करणाऱ्यांना गैरवर्तनाच्या आरोपाखाली दोषी ठरवलं जाईल असं स्पष्ट केलं आहे. आजही आपल्याकडे कौमार्य चाचणी घेतली जाते हे निंदनीय आहे अशी खंतही कोर्टाने व्यक्त केली. न्यायमूर्ती डी वाय चंद्रचूड आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. बलात्कार प्रकरणी शिक्षा सुनावताना त्यांनी ही टिप्पणी केली.



"या न्यायालयाने वारंवार बलात्कार आणि लैंगिक शोषण प्रकरणात कौमार्य चाचणी करण्यास नकार दिला आहे. या चाचणीला कोणताही आधार नाही. याउलट पीडित महिलेवर पुन्हा अत्याचार करण्यासारखं असून, तिला अजून एक मानसिक धक्का देण्यासारखं आहे. ही चाचणी घेतली जाऊ नये. लैंगिकदृष्ट्या सक्रीय स्त्रियांवर बलात्कार केला जाऊ शकत नाही या चुकीच्या आधारावर ही चाचणी केली जात आहे. पण सत्यापेक्षा मोठं काही नाही," असं निरीक्षण खंडपीठाने नोंदवलं. "महिलेने दिलेली साक्ष आणि तिच्या लैंगिकतचा काही संबंध नाही. एखादी स्त्री केवळ लैंगिकदृष्ट्या सक्रिय असल्याने तिच्यावर बलात्कार झाला असं सुचवणं ही पुरुषप्रधान मानसिकता आणि लैंगिकतावादी आहे," असं निरीक्षण कोर्टाने नोंदवलं. खंडपीठाने यावेळी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला बलात्कार आणि लैंगिक शोषणातील पीडितांची कौमार्य चाचणी घेतली जाणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत. तसंच केंद्र सरकारसह राज्य सरकारांना आरोग्य आणि कुटुंब मंत्रालयाच्या गाईडलाइन्स सर्व सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये पाठवण्याचा आदेश दिला आहे.

खंडपीठाने पीडित महिलांची योग्य चाचणी व्हावी यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांचं वर्कशॉप घेण्याचीही सूचना केली. तसंच वैद्यकीय अभ्यासक्रमांची चाचपणी करण्यास सांगितलं आहे. जेणेकरुन बलात्कार किंवा लैंगिक शोषण पीडित महिलांची तपासणी करताना कौमार्य चाचणी एक प्रक्रिया म्हणून मान्य केली जाणार नाही.

तेलंगणा हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध दाखल केलेल्या अर्जावर निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने हे निरीक्षण नोंदवलं. तेलंगण हायकोर्टाने बलात्कार प्रकरणी ट्रायल कोर्टाने नोंदवलेली शिक्षा रद्द केली होती.

# पंजाबच्या विजयानंतर आपचे लक्ष्य कर्नाटककडे! आप नेत्यांनी मांडले विजयाचे गणित


। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दिल्लीत सत्ता स्थापन केल्यानंतर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल (arvind kejriwal) यांच्या आम आदमी (aap) पक्षाने दक्षिणेकडे मोर्चा वळवला आहे. दिल्ली सोबतच पंजां राज्यातही आम आदमी पार्टीचे सरकार आहे. अशातच कर्नाटक निवडणुकमध्येही निवडणुकीचे पडघम वाजत आहेत. दरम्यान कर्नाटक (karnataka) राज्यातील 224 म्हणजेच सर्वच विधानसभा मतदार संघात आपले उमेदवार उभे करण्याची घोषणा आम आदमी पक्षाने केली आहे.

दरम्यान आप हा पक्ष 'जेसीबी'ला म्हणजेच (जेडीएस-काँग्रेस-बीजेपी) समर्थ पर्याय देईल, असे आपचे संयोजक पृथ्वी रेड्डी यांनी सांगितले. पक्षाचे प्रवक्ते आणि कर्नाटक आप पक्षाचे संयोजक पृथ्वी रेड्डी (pritwi reddy) हे आहेत. त्यांनी सांगितल्या नुसार, कर्नाटक राज्यातील 224 मतदारसंघात आपचे उमेदवार उभे करण्याचा निर्णय आम आदमी (aap) पक्षाने घेतला आहे. राज्यातील 170 मतदारसंघात बूथनिहाय कार्यकर्त्यांची निवड प्रक्रियासुद्धा सुरू झालेली आहे. जानेवारीच्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पहिली यादी जाहीर होण्याची शक्यताही आहे. कर्नाटक राज्यात सुमारे 58 हजार बूथ आहेत आणि पक्षाकडून प्रत्येक बुथवर किमान दहा कार्यकर्त्यांची नियुक्त केली जाणार आहे. असेही रेड्डी म्हणाले.

बुथ लेव्हलवर (booth level) कार्यकर्त्यांची नियुक्ती करून आम आदमी पक्ष कर्नाटक राज्यात अगदी तळागाळा पर्यंत पक्ष बांधणी करत आहे. भ्रष्टाचार, पैसा याविरुद्ध आप पक्ष लढा डेटग आहे. स्थानिक पातळीवरचे प्रश्न, समस्या जनतेसमोर मांडण्याची जबाबदारी बूथवर नियुक्त करण्यात येणाऱ्या कार्यकर्त्यांवर सोपविण्यात आली आहे. आप पक्षाला कर्नाटकात लोकप्रियता मिळत आहे असेही रेड्डी म्हणाले. राज्यात तीन मोठे पक्ष भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्यास अपयशी ठरले आहेत, त्याचसोबत पक्ष जिंकण्यासाठी लढत आहे.

# मालती मेरीला भेटण्यासाठी परिणीती चोप्रा उत्सुक

अभिनेत्री प्रियांका चोप्रा मुलगी मालती मेरीसोबत भारतात येत आहे. यामुळे प्रियांकाची चुलत बहीण परिणीती चोप्रा खूप खूश आहे. परिणीतीची भाची मालती मेरी हिच्या स्वागतासाठी तिने सर्व तयारी केली आहे. कारण मालती पहिल्यांदाच परिणीतीच्या घरी येणार आहे. प्रियांका आणि मालती बरोबर वेळ घालवण्यासाठी परिणीती उत्सुक आहे. यासाठी तिने दिवस खास प्लॅन्सही आखले आहेत. अलीकडेच परिणीतीने एका संभाषणादरम्यान प्रियांका चोप्रा, भाची मालती मेरी आणि मेव्हणा निक जोनासबद्दल सांगितले. यावेळी बोलताना मालतीबरोबर ती खूप खेळणार असल्याचे तिने जाहीर केले. त्यासोबतच परिणीतीला मालतीला एक खास चित्रपट दाखवायचा असल्याचे तिने सांगितले. हा चित्रपट म्हणजे परिणीतीचा ‘हसी तो फसी’ आहे. तसेच हा चित्रपट दाखवण्याचे स्पष्ट तिने स्पष्ट केले आहे. परिणीतीला नुकत्याच एका मुलाखतीदरम्यान “तुला मालतीला कोणता चित्रपट दाखवायला आवडेल?” असा प्रश्न विचारण्यात आला. यावर तिने क्षणाचाही विलंब न करता ‘हसी तो फसी’ या चित्रपटाचे नाव घेतले. त्यासोबतच मालतीला ‘हसी तो फसी’ हा चित्रपट दाखवण्यामागचे कारण परिणीतीने सांगितले. परिणीती म्हणाली की, तिचा सर्वात लहान मुलंही पाहू शकतील असा आहे. अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि परिणीती चोप्रा यांच्या 'हसी तो फसी' चित्रपटत प्रमुख भूमिका आहेत.


# “गावातली मुलगी ते सेक्स कॉमेडी



मुलाखतीत राधिकाने तिचा आगामी काळातील करिअर प्लान, वेगळं करिअर आणि एका विशिष्ट भूमिकेनंतर येणारा भूमिकांमधील एकसूरीपणा यावर भाष्य केलं. बॉलिवूड इंडस्ट्रीसाठी २०२० हे वर्ष खूपच कठीण गेलं. करोना काळात अनेक प्रोजोक्ट्स काम बंद पडलं, शूटिंग थांबवण्यात आलं. पण अभिनेत्री राधिका आपटेसाठी मात्र या सगळ्याच्या विरुद्ध होतं. करोनाच्या काळातही राधिकाकडे बरंच काम होतं आणि ती सातत्याने काम करत होती. ज्यामुळे तिच्या ज्ञानातही भर पडण्यास मदत झाली असं तिने नुकच्याच दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. “या काळात मला जाणवलं की जवळपास १० वर्ष काम केल्यानंतर आता मी ब्रेक घेऊन माझा प्राधान्यक्रम ठरवायला हवा आणि नव्याने सुरुवात करायला हवी असं वाटलं.” असं राधिका ‘इंडियन एक्सप्रेस’ला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली. राधिका आपटे काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या हृतिक रोशन आणि सैफ अली खान यांच्या ‘विक्रम वेधा’ या चित्रपटात एका वकीलाच्या भूमिकेत दिसली होती. लवकरच तिचा ‘मोनिका ओ माय डार्लिंग’ चित्रपट लवकरच नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होत आहे. पण आता राधिकाला फक्त एक अभिनेत्री म्हणून मर्यादित न राहता आणखी काही वेगळं करायचं आहे. ‘इंडियन एक्सप्रेस’ला दिलेल्या मुलाखतीत राधिकाने तिचा आगामी काळातील करिअर प्लान, वेगळं करिअर आणि एका विशिष्ट भूमिकेनंतर येणारा भूमिकांमधील एकसूरीपणा यावर भाष्य केलं. राधिका आपटेला या मुलाखतीत, ‘जेव्हा तुम्ही एखादी भूमिका उत्तम पद्धतीने साकारता तेव्हा तुम्हाला पुढेही तशाच प्रकारच्या भूमिका ऑफर होतात. तूही यातून गेली आहेस. या सगळ्याचा कसा सामना केलास?’ असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर राधिका म्हणाली, “जेव्हा मी या इंडस्ट्रीत आले तेव्हा मला गावातली मुलगी किंवा साडी नेसणारी मुलगी अशा भूमिका मिळायच्या, पण ‘बदलापूर’नंतर मला अचानक सेक्स कॉमेडी असलेल्या भूमिका ऑफर केल्या जाऊ लागल्या, त्यानंतर मला थ्रीलर चित्रपट ऑफर होऊ लागले.” राधिका पुढे म्हणाली, “आता मी फक्त ओटीटी सीरिज करत आहे असा लोकांचा समज आहे. प्रत्यक्षात मात्र

# मानधनावरून होणाऱ्या भेदभावावर सोनाक्षी सिन्हाने मांडले परखड मत

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा गेल्या काही दिवसांपासून तिच्या ‘डबल एक्सएल’ (DOUBLE XL) या आगामी चित्रपटाच्या प्रमोशन्समध्ये व्यग्र आहे. या चित्रपटामध्ये तिच्यासह हुमा कुरेशी प्रमुख भूमिकेमध्ये दिसणार आहे. या चित्रपटाद्वारे दिग्दर्शक सतराम रमानी यांनी बॉडी शेमिंग या महत्त्वपूर्ण विषयावर भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये ती सायरा खन्ना या भूमिकेमध्ये दिसणार आहे. झहीर इक्बाल आणि महत राधवेंद्र यांनी या चित्रपटामध्ये सहाय्यक व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. ४ नोव्हेंबर रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.२०२१ मध्ये तिचा ‘भुज: द प्राईड ऑफ इंडिया’ हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मागील तीन-चार वर्षांमध्ये सोनाक्षीचे बरेचसे चित्रपट बॉक्स ऑफिसवर दाखल झाले. पण त्यातल्या फार कमी चित्रपटांना लोकांची पसंती मिळाली. ‘डबल एक्सएल’च्या निमित्ताने सोनाक्षी नव्या अवतारामध्ये दिसणार आहे. तिच्या चाहत्यांना या चित्रपटाकडून फार अपेक्षा आहेत. प्रदर्शनाची तारीख जवळ आल्याने चित्रपटाची संपूर्ण टीम सध्या प्रमोशनल कार्यक्रमांमध्ये गुंतलेली आहे. अशाच एका मुलाखतीमध्ये तिने बॉडी शेमिंग, सिनेसृष्टीमधील भेदभाव, ट्रोल्स अशा मुद्द्यांवर मत मांडले आहे.



# हे व्हीएफएक्स नाही हा खराखुरा..

प्राणी बघायला मिळतात. वाढत्या शहरीकरणामुळे जंगले नाहीशी होताना दिसून येत आहेत. कालच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय वन उद्यानातं सकाळी ११.३० च्या सुमारास लीव्हर खेचून तीन चित्ते उद्यानात सोडले. १९५२ मध्ये चित्ता भारतातून नामशेष झाले होते. आता पुन्हा एकदा भारतात चित्ते दिसणार आहेत. आजवर बॉलिवूडमध्ये वाघ, सिंह असे प्राणी चित्रपटांमध्ये दाखवले गेले आहेत. मात्र चित्ता हा प्राणी कधी दिसण्यात आला नाही. बॉलिवूडमधील एका अभिनेत्रीने मात्र खऱ्याखुऱ्या चित्त्यासोबतचा फोटो शेअर केला होता.

अभिनेत्री करिष्मा कपूर गेली अनेक वर्ष सिनेसृष्टीत कार्यरत आहे. दोन वर्षांपूर्वी करिष्माने चित्यासोबतचा फोटो शेअर केला होता. या फोटोमध्ये चित्ता गाडीच्या बोनेटवर उभा आहे तर करिष्मा कपूर घाबरलेली दिसत आहे. तिने या फोटोला कॅप्शन दिला आहे की, ‘या फोटोत कोणतेही व्हीएफएक्स नाही अथवा कॉम्पुटरने एडिट केलेले नाही. या फोटोत मी एका सुंदर चित्यासोबत आहे. अर्थात मी घाबरलेले होतेच. हा चित्रपट ओळखा बरं? अशा शब्दात तिने कॅप्शन लिहला आहे. चाहत्यांनी कंमेंट्समधून या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे’. करिश्माने शेअर केलेला फोटो हा २००० साली आलेल्या शिकारी चित्रपटातील आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण दक्षिण आफ्रिकेत करण्यात आले होते. या चित्रपटात तिच्याबरोबर गोविंदा,तब्बू हे कलाकारदेखील होते. ‘राजा हिंदुस्तानी’, ‘दिल तो पागल हैं’ सारखे एकाहून एक सरस हिट चित्रपट करिष्मा कपूरने दिले आहेत. करिष्मा कपूरचे आई वडीलदेखील अभिनय क्षेत्रात कार्यरत होते.

करिश्मा कपूरचं याआधी दिल्लीतील व्यावसायिक संजय कपूर याच्याशी २००३ मध्ये लग्न झालं होतं. या लग्नापासून तिला मुलगी समायरा आणि मुलगा कियान अशी दोन मुलं आहेत. २०१४ मध्ये या दोघांचं नातं संपल्याचं जाहीर झालं आणि २०१६ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. करिश्मा कपूरने आमिर खान, सलमान खान आणि शाहरुख खान यांसारख्या दिग्गज कलाकारांबरोबर काम केले आहे



# न्यूझीलंड दौऱ्यासाठी भारतीय संघ जाहीर!

## हार्दिक पांड्याकडे कर्णधारपदाची धुरा, ऋषभ पंत उपकर्णधार

मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



टी-२० विश्वचषक २०२२ च्या समाप्ती नंतर टीम इंडियाला न्यूझीलंडचा दौरा करायचा आहे. या दौऱ्यासाठीचा संघ बीसीसीआयने सोमवारी (३१ ऑक्टोबर) जाहीर केला आहे. भारताला न्यूझीलंडविरुद्ध तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळायचे आहेत. या मालिकेसाठी टीम इंडियाच्या वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे, त्यामुळे टी-२० संघाची कमान हार्दिक पांड्याकडे देण्यात आली आहे. त्याचबरोबर वनडे संघाचे कर्णधारपद शिखर धवनकडे सोपवण्यात आले आहे. तसेच दोन्ही संघाच्या उपकर्णधार पदाची जबाबदारी ऋषभ पंतकडे देण्यात आली आहे.

विराट कोहली, रोहित शर्मा, केएल राहुल, दिनेश कार्तिक, रविचंद्रन अश्विन, मोहम्मद शमी यांसारखे वरिष्ठ खेळाडू न्यूझीलंड दौऱ्यासाठी संघाचा भाग नाहीत. म्हणजेच हे सर्व खेळाडू टी-२० विश्वचषक २०२२ नंतर आपापल्या घरी परततील. भारतीय संघ सध्या ऑस्ट्रेलियात आहे आणि टी-२० विश्वचषक खेळत आहे, त्यामुळे न्यूझीलंड ऑस्ट्रेलियाच्या जवळ आहे. त्यामुळे या दौऱ्यानंतरच उर्वरित संघ मायदेशी परतणार आहे. नोव्हेंबरनंतर भारताला डिसेंबरमध्ये बांगलादेशचा दौरा करायचा आहे. टी-२० मालिकेसाठी टीम इंडिया: हार्दिक पंड्या (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार), शुभमन गिल, इशान किशन, दीपक हुडा, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, युजवेंद्र चहल, के. यादव, अर्शदीप सिंग, हर्षल पटेल, मोहम्मद सिराज, भुवनेश्वर कुमार, उमरान मलिक.

वनडे मालिकेसाठी टीम इंडिया: शिखर धवन (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार), शुभमन गिल, दीपक हुडा, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, शाहबाज अहमद, युजवेंद्र चहल, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, दीपक चहर, कुलदीप सेन, उमरान मलिक.

# सर्व पत्ते पुन्हा पिसायला हवेत.!

*पाकिस्तान विरुद्ध अविश्वासनीय विजय मिळवून भारतीय संघाने देशवासियांना दिवाळीची भेट दिली,पण त्याबरोबरच भारतीय संघाकडून अपेक्षाही वाढल्या.रविवारी भारताची लढत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पर्थ ला होती.वरुणराजाने कृपा केल्याने पुर्ण सामना झाला आणि दक्षिण आफ्रिकेने भारताचा चुरशिच्या सामन्यात पाच विकेटनी पराभव केला आणि भारताचा अश्व जमिनीवर आणला.*

पर्थची खेळपट्टी हि जगातली सगळ्यात वेगवान आणि चेंडूला उसळी देणारी समजली जाते.त्यात समोर आफ्रिकेचा वेगवान मारा होता ज्यात रबाडा,नगीडी,नॉरके आणि पारनेल सारखे वेगवान गोलंदाज होते,तरीही रोहित शर्मा ने नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारली.के एल राहुल आणि रोहित शर्मा दोघेही धावांसाठी झगडत असताना बलाढ्य गोलंदाजी विरुद्ध पहिले फलंदाजी करण्याचा निर्णय आश्चर्यकारक होता आणि घडलेही तसेच.राहुल सध्या धावांसाठी झगडत आहे आणि पॉवरप्ले मध्ये फक्त दोन क्षेत्ररक्षक बाहेर असताना बेधडक फलंदाजी अपेक्षित असताना तो बचावत्मक सुरवात करतो आणि नंतर विकेट गमावतो.रोहित शर्मा सुद्धा सध्या धावांसाठी झगडतोय आणि अशा सावध सुरवातिमुळे पहिले 10 चेंडू निर्धाव गेले त्यामुळे दडपण वाढले आणि पहिले रोहित आणि मग राहुल स्वस्तात परतले. पाकिस्तान विरुद्ध अविश्वासनीय खेळी करणाऱ्या विराट ने दडपण झुगारत चांगली सुरवात केली पण इन्गिडीच्या आखूड चेंडूवर फाईन लेग ला झेल देऊन तो बाद झाला आणि अक्ख स्टेडियम एकदम शांत झालं. आता सूर्यकुमार यादव ने सूत्र हातात घेतली आणि अचानक आफ्रिकेची गोलंदाजी आणि पर्थ ची खेळपट्टी दोन्ही सामान्य वाटायला लागले. हा सूर्यांकुमार यादव खरंच सूर्य देवाचा आशीर्वाद घेऊन आलेला वाटतो. चेंडू टाकण्या आधीच भारताच्या MR 360 सूर्या ला चेंडू कळतो कि काय अश्या थाटात तो यादवांचा वंशज असल्या प्रमाणे तलवारी सारखी बॅट फिरवतो आणि चेंडू फटकावतो. इन्गिडी नॉरके रबाडा यांना लीलाया खेळत त्याने मात्र चाळीस चेंडूत अडुसष्ठ धावा फटकावल्या आणि एक वेळ पाच बाद पन्नास अश्या अवस्थेतून भारताला एकशे तेहेतीस अशा सन्मानजनक धावसंख्येवर पोचवले. आफ्रिकेकडून इन्गिडी ने एकोणतीस धावात चार बळी मिळवले.



विशेष
सुनील शाळगावकर
क्रिकेट प्रशिक्षक

भारताच्या आव्हानाचा पाठलाग करताना आफ्रिकेची फलंदाजी पण कोलमडली. आशिया कप मध्ये मार खाणारा भुवी ऑस्ट्रेलिया मध्ये कमालीचा यशस्वी ठरत आहे आणि आजही त्याने सुरेख गोलंदाजी केली पण खरी कमाल नवोदित अर्शदीप सिंग ने केली. आशिया कप मध्ये पाकिस्तान विरुद्ध झेल सोडल्याने लोकांच्या रोषाला सामोरे गेलेल्या अर्शदीप ने त्यानंतर घेतलेली भरारी कौतुकास्पद आहे. पाकिस्तान विरुद्ध अप्रतिम गोलंदाजी केल्यावर आजही त्याने पहिल्याच षटकात डिकॉक आणि रुस्सो ला माघारी धाडले. दोन्ही दिशांना चेंडू स्विंग करण्याचे त्याचे कसब वखाणण्या जोगे आहे. त्याने भुवी आणि शमी च्या बरोबर टिचून मारा केला आणि एक वेळ आफ्रिकेला तीन बाद चोविस असे अडचणीत आणले. पण इथून मार्क्रम आणि मिलर यांनी सुरवातीला सावध खेळून आणि नंतर आक्रमण करून प्रत्येकी अर्ध शतक झळकावून आफ्रिकेला विजयी केले. विराट ने सोडलेला सोप्पा झेल आणि रोहित नी सोडलेला सोप्पा धावचीत याने आफ्रिकेला मदतच केली.

भारताचे पुढील साखळी सामने आता धोकादायक झिम्बाबवे आणि अडखळणाऱ्या बांगला देश बरोबर आहेत. या दोन्ही संघाना गृहीत धरणं भारताला महागात पडू शकतं. राहुल आणि रोहित ची फलंदाजी पुढच्या फलंदाजावर दडपण वाढवतीये. विराट आणि सूर्या प्रत्येक वेळी तुम्हाला जिंकून नाही देऊ शकणार. दीपक हुडा ला संघात फक्त फलंदाज म्हणून घेण्यापेक्षा अक्षर पटेल संघात असावा. अश्विन परदेशात विकेट काढत नाही, खरंतर त्याला विकेट मिळेल असे कधीच वाटत नाही, आजही चार षटकात त्याने अठ्ठेचालीस धावा दिल्या त्यामुळे त्याला संघात ठेवायचं कि नाही याचा विचार करावाच लागेल. राहुलच्या जागी आघाडी ला पंत चा विचार होऊ शकतो. एकंदरीत भारताची गोलंदाजी सध्या



# बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा आयर्लंडवर ४२ धावांनी विजय

## लॉर्कन टकरची अर्धशतकी खेळी ठरली व्यर्थ

।ओडेन्से।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



ऑस्ट्रेलिया आणि आयर्लंड संघात टी-२० विश्वचषक २०२२ मधील ३१ वा सामना आज पार पडला. ब्रिस्बेन येथील गाबा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने ४२ धावांनी विजय नोंदवला. ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना आयर्लंड संघासमोर १८० धावांचे लक्ष्य ठेवले होते. परंतु आयर्लंडचा संघ १३७ धावांवर आटोपला. आयर्लंडकडून लॉर्कन टकरने एकाकी झुंज देताना अर्धशतक झळकावले.

१८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आयर्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. २५ धावांवर संघाच्या पाच विकेट पडल्या. त्यानंतर टकरने डेलेनी आणि अडायरसोबत उपयुक्त भागीदारी करून आयर्लंडची धावसंख्या १०० पर्यंत नेली. लॉकरन टकरने ४८ चेंडूत ९ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ७१ धावा केल्या. परंतु त्याची ही झुंजार खेळी आयर्लंडला विजय मिळवून देऊ शकली नाही.

तत्पुर्वी नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने आयर्लंडसमोर १८० धावांचे लक्ष्य ठेवले होते. निर्धारित २० षटकांत कांगारू संघाने ५ गड्यांच्या मोबदल्यात १७९ धावा केल्या. ज्यामध्ये कर्णधार फिंचने सर्वाधिक ६३ धावा केल्या. मार्कस स्टॉइनिसने ३५ आणि मिचेल मार्शने २८ धावांचे योगदान दिले. आयर्लंडकडून मॅकार्थीने तीन आणि जोशुआ लिटलने दोन बळी घेतले.

# हारिस रौफने जिंकले मन

मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

रविवारी (३० ऑक्टोबर) पर्थच्या मैदानावर झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या २९व्या सामन्यात पाकिस्तानने नेदरलँड्सचा ६ गडी राखून पराभव केला. या सामन्यादरम्यान हारिस रौफचा धोकादायक बाऊन्सर नेदरलँड्सचा बॅट्समन बास डी लीडच्या हेल्मेटला लागला, त्यानंतर बॅट्समनला दुखापत होऊन मैदान सोडावे लागले. सामन्यानंतर हारिस रौफ बास डी लीडेला भेटताना दिसला, ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.हारिस रौफ आणि बास डी लीडे यांचा हा व्हिडिओ आयसीसीनेच त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवरून शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये हारिस सामना संपल्यानंतर जखमी फलंदाजाला विचारताना दिसत आहे.